# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ २९९४ /२०१९ पुणे शहर, दिनांक २२/०३/२०१९

**विषय :- दुचाकी वाहनावरील सहप्रवाशी यांनीही हेल्मेट परिधान करण्याचे अवाहन.**

---

पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत चालण्यासाठी वाहतूक शाखेकडून नियमीत प्रयत्न करण्यात येत असून, वाहनचालकांकडून करण्यात येणा-या वाहतूक नियमभंगामुळेच अनेक लहान मोठे अपघात होत असल्याचे निदर्शनास येत आहे त्यामध्ये दुचाकी वाहन चालविताना हेल्मेट परिधान न केल्यामुळे प्राणांतिक अपघात होत आहेत, शहरात रात्रीचेवेळी दुचाकी वाहनचालविताना हेल्मेट परिधान करण्याचे प्रमाण कमी असून रात्रीचे वेळी वाहतुक नियमभंगाची कारवाई करण्याकरीता वाहतुक शाखेकडून कारवाईची पाच पथके नियुक्त करण्यात आली असुन सदर पथकाद्वारे कारवाई करण्यात येत आहे.

दिनांक- २०/०३/२०१९ व २१/०३/२०१९ रोजी १. एम.ई.एस. वॉटर सप्लाय जवळील सर्व्हीस रोडवर विश्रांतवाडी पुणे २. आगाखान ब्रिजवरुन आल्यावर शास्त्रीनगरकडे जाणा-या दुहेरी रस्त्यावर येरवडा पुणे या ठिकाणी झालेल्या अपघातांमध्ये दुचाकी वाहनावर मागे बसलेले सहप्रवाशी हे खाली रस्त्यावर पडल्यावर त्यांचे डोक्यास मार लागल्याने ते मयत झाले आहेत.

तरी वाहनचालकांना आवाहन करण्यात येते की, दिवसा व रात्रीचे वेळी वाहतूकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करून शहरातील वाहतुक सुरळीत करण्यात योगदान द्यावे तसेच दुचाकी वाहन चालविणा-या चालकाने व दुचाकीवरील सहप्रवाशी यांनीही आपल्या जिवीताचे सुरक्षीतता करीता हेल्मेट परिधान करावे.